# प्रेस नोट

# पुणे पोलीस आयुक्तालय

# गणेशोत्सव विसर्जन मिरवणुक २०२४ ध्वनी प्रदुषण बाबत

-----------oooo----------




गणेशोत्सव २०२४ अनुषंगाने दि. १७/०९/२०२४ व दि. १८/०९/२०२४ रोजीचे दरम्यान पुणे शहरात गणेश विसर्जन मिरवणुक सोहळा पार पडणार आहे. विसर्जन मिरवणुकीचे दरम्यान बऱ्याच मंडळांकडून डी. जे. चा वापर केला जातो.

ध्वनी प्रदुषणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व राष्ट्रीय हरित लवाद यांनी नियमावली दिली आहे. सदर आदेश व राष्ट्रीय हरित लवाद यांचे नियमांवलीचे पालन करणेबाबत सर्व मंडळांना स्थानिक पोलीस स्टेशन स्तरावर सुचना दिलेल्या आहेत.

डी. जे. च्या उपकरणामध्ये वेगवेगळे आवाजासाठी मुख्यतः प्रेशर मोड - ४५९९/४५९० उपकरणे वापरले जाते. त्याद्वारे सर्वसाधारण आवाज व कर्णकर्कश आवाज निर्माण करता येतो. सदर कर्णकर्कश आवाजामुळे मोठया प्रमाणात ध्वनी प्रदुषण होते तसेच त्याचा मानवी शरीरावर विघातक परिणाम होतात. सदर कर्णकर्कश आवाजामुळे मानवी शरीरास मुख्यतः कानास इजा होऊन कर्णबधीरपणा होऊ शकतो. तसेच वातावरणात मोठया प्रमाणात कंपन निर्माण होऊन उच्च रक्तदाब व हृदय विकार असणाऱ्या व्यक्तींना मोठया प्रमाणात त्रास होतो. प्रसंगी अशा व्यक्तीस मोठया प्रमाणात शारिरीक समस्यांना सामोरे जावे लागते.

वरील छायाचित्रातील प्रेशर मोड उपकरण वापरून विसर्जन मिरवणुकी दरम्यान कर्णकर्कश आवाज निर्माण केल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे व राष्ट्रीय हरित लवाद नियमांवली मधील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळ व डी.जे. व्यवस्थापक यांचेवर योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व उपकरणे जप्त करण्यात येतील.

**( जी. श्रीधर )**
**पोलीस उप-आयुक्त,**
**विशेष शाखा, पुणे शहर.**